# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि. २१/१२/२०२०

आरोपी लोकसेवक १) अनिल माणीकराव भगत वय-५० वर्ष, पोलीस नाईक ब.नं. ६३३, वर्ग-३, पो.स्टे. अनसिंग जि. वाशिम रा. ह.मु. शासकिय निवासस्थान पो.स्टे. अनसिंग जि. वाशिम मुळपत्ता अशोक नगर, मंगरुळपीर जि. वाशिम व २) पांडुरंग तुकाराम नागरे वय अंदाजे ४० वर्ष, व्यवसाय कारकुन व पोलीस पाटील ग्राम बाभुळगांव जि. वाशिम रा. अल्लाडा प्लॉट, वाशिम. यांना ८,०००/- रुपयेची लाच मागणी प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | १) अनिल माणीकराव भगत वय-५० वर्ष, पोलीस नाईक ब.नं. ६३३, वर्ग-३, पो.स्टे. अनसिंग जि. वाशिम रा. ह.मु. शासकिय निवासस्थान पो.स्टे. अनसिंग जि. वाशिम मुळपत्ता अशोक नगर, मंगरुळपीर जि. वाशिम.<br>२) पांडुरंग तुकाराम नागरे वय अंदाजे ४० वर्ष, व्यवसाय कारकुन व पोलीस पाटील ग्राम बाभुळगांव जि. वाशिम रा. अल्लाडा प्लॉट, वाशिम. |
| लाच मागणी रक्कम | तक्रार - १०,०००/-रुपये<br>तडजोडीअंती - ८,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे विरुध्द पो.स्टे. अनसिंग जि. वाशिम येथे दाखल गुन्हयात फायनल पाठविणे करीता आलोसे यांनी तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | एस.व्ही. शेळके, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांचे विरुध्द पोलीस स्टेशन अनसिंग येथे दाखल गुन्हयात मदत करणे कामी तक्रारदार यांना रु. १०,०००/- लाचेची मागणी केल्याची दि. ०७/१२/२०२० रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. ०७/१२/२०२० रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक व खाजगी इसम यांना तडजोडीअंती तक्रारदार यांना ८०००/- रुपये लाचेची मागणी करुन मध्यस्थी खाजगी इसम यांचे मार्फत स्विकारण्याचे मान्य केले तसेच खाजगी इसम यांनी लोकसेवक यांचे करीता तक्रारदार यांचे कडे लाचेची मागणी केली व ती स्विकारण्याचा प्रयत्न करुन लोकसेवक यांना लाचमागणी करीता मदत केल्याचे निष्पन्न झाले.

दि. २१/१२/२०२० रोजी तक्रारदार यांनी समक्ष ला.प्र.वि. वाशिम येथे हजर येवुन जबाब नोंदविला की, पडताळणी कार्यवाही नंतर २ ते ३ दिवसांनी तक्रारदार यांना अनोळखी व्यक्तीने तक्रारदार यांचे मोबाईलवर कॉल करुन कळविले की, त्यांचे विरुध्द दाखल गुन्हयात फायनल पाठविले आहे, आता कुणालाही पैसे देण्याचे काम नाही. यावरुन तक्रारदार यांना आरोपी यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान संशय आल्याची खात्री झाली व तक्रारदार यांचे कडुन आरोपी आता लाच रक्कम स्विकारणार नाहीत याबाबत खात्री झाल्याचा जबाब नोंदविल्याने लाच मागणी संबंधाने गुन्हा पोलीस स्टेशन वाशिम शहर जि. वाशिम येथे नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विशाल वि. गायकवाड, मा. प्रभारी अपर पोलीस अधिक्षक गजानन पडघण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधिक्षक एस.व्ही. शेळके, व अंमलदार सपोउपनि. नंदकिशोर परळकर, पोहवा. रमेश बोडखे, पोना. विनोद अवगळे, रविंद्र घरत, राहुल व्यवहारे, सुनिल मुंदे ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन एस.व्ही. शेळके, पोलीस उपअधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
एस.व्ही. शेळके - ९९२१०३८१११

(एस.व्ही. शेळके)
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.